सांगली, दि. १४.७.२०२१

## सांगली शिक्षण संस्थेचे अखिल सदस्य मंडळ

**माननीय सभासद बंधु, भगिनी,**

सप्रेम नमस्कार वि.वि.

दि. १७.९.२०११ व १२.११.२०११ च्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर झालेल्या घटनेत बदलत्या काळानुसार काही बदल करणे आवश्यक झाल्याने दिनांक ९.१०.२०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळ सभेत संस्थेच्या विद्यमान घटनेत व निवडणूक नियमात बदल/दुरुस्ती/वाढ सुचविणेसाठी समितीची स्थापना करणेत आली. दि. २१.१०.२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या २०१८-२०१९ च्या अहवाल ताळेबंदामध्ये पान क्रमांक १८ वर सर्व सन्माननीय सभासदांना विद्यमान घटनेत, निवडणूक नियमात कांही बदल/दुरुस्ती/वाढ सुचवावयाची असेल तर तशा लेखी सूचना दि. २९.२.२०२० अखेर पाठवाव्यात असे निवेदन करण्यात आले होते. सर्व सभासदांच्या सोईसाठी संस्थेची मंजूर घटना व मंजूर निवडणूक नियम संस्थेच्या www.sss.ac.in या संकेत स्थळावर दि. २३.१०.२०१९ रोजी प्रसिध्द करणेत आले होते. त्याचप्रमाणे याच आशयाची जाहीर सूचना दैनिक तरुण भारत, सांगली या वर्तमानपत्रामधून दि.१६.११.२०१९ पान क्रमांक सात वर प्रसिध्द करणेत आली होती. त्यानंतर दि.१३.२.२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या अध्यक्षांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात विद्यमान घटना, निवडणूक नियम यातील बदल/दुरुस्ती/वाढ कोणास सुचवावयाची असेल तर तशा लेखी सूचना दि.३१.३.२०२१ पर्यंत संस्थेकडे पाठवाव्यात अशी विनंती केली होती.

बदलत्या काळानुसार आवश्यक असणारे सुसंगत असे बदल संचालक मंडळाने सुचविले आहेत. सुचविलेल्या दुरुस्त्या आणि वाढ हया संस्थेच्या अंतर्गत प्रशासकीय सोयीसाठी, कायद्याशी सुसंगतता राखणेसाठी आणि अधिक सुस्पष्टता आणणेसाठी नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्याबाबतचा सविस्तर तपशिल सोबत जोडला आहे. तरी सर्व बाबींचा विचार करुन घटना दुरुस्तीस आपण मान्यता द्यावी अशी नम्र विनंती आहे.

आपले नम्र,

**शि.वा.गोसावी** **श.स.देशपांडे**
**कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, सांगली**

**नि.गं.खाडिलकर**
**अध्यक्ष, सांगली शिक्षण संस्था, सांगली**

---

॥ ॐ तेजस्विनावधीतमस्तु ॥

# सांगली शिक्षण संस्थेचे कार्यालय

**व्दारा सिटी हायस्कूल, गांवभाग, सांगली ४१६ ४१६**

## सांगली शिक्षण संस्थेच्या अखिल सदस्य मंडळाच्या माननीय सभासदांना

# विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

सप्रेम नमस्कार वि.वि.

सांगली शिक्षण संस्थेच्या अखिल सदस्य मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा कोविड संदर्भातील सर्व आदेश आणि नियम यांचे पालन करुन **शुक्रवार, दिनांक ३०.०७.२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. डॉ. बापट बाल शिक्षण मंदीर सांगली** या शाळेच्या सभागृहात (सिटी हायस्कूल, सांगली येथे लसीकरण केंद्र असल्याने) बोलाविली आहे. तरी आपण या सभेस अगत्य उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

**✻ विशेष सर्वसाधारण सभेपुढे येणारी कामे :-**

१) सांगली शिक्षण संस्थेच्या अखिल सदस्य मंडळाच्या दिनांक १३.२.२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सांगली शिक्षण संस्थेच्या विद्यमान घटनेत संचालक मंडळाने आपल्या ठराव नंबर ४/७.७.२०२१ अन्वये कांही वाढ/बदल/दुरुस्त्या सुचविल्या आहेत. त्या पाहून त्यास मान्यता देणे.

३) माहितीसाठी येणारी कामे.

४) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे आयत्यावेळी येणा-या कामांचा विचार करणे.

तरी सदर सभेस आपण अगत्य उपस्थित असावे अशी विनंती आहे. कळावे,

सांगली,
दि. १४.७.२०२१

आपले नम्र,

**शि.वा.गोसावी** **श.स.देशपांडे**
**कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, सांगली**

**नि. गं. खाडिलकर**
**अध्यक्ष, सांगली शिक्षण संस्था, सांगली**

**फोन नंबर ०२३३/२३३२२९९, २३३२९९७**, e-mail – sangli.shikshan@gmail.com

**टीप :** ✻ संस्थेच्या मंजूर घटनेप्रमाणे सभेसाठीची गणसंख्या किमान पंचवीस आहे. ✻ गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वाजता सुरु होईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. ✻ तसेच मूळ विषय-पत्रिके खेरीज अन्य विषय कामकाजात समाविष्ट होणार नाहीत.

| अ.क्र. | | | विद्यमान घटना पृष्ठ क्रमांक | सध्याच्या घटनेतील मूळ कलम | सुचविलेली दुरुस्ती/वाढ/बदल | कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सांगली शिक्षण संस्था, सांगली.<br>(दि सांगली एज्युकेशन सोसायटी, सांगली) | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | | घटना | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | | नोंदणीकरण | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | | संस्थांचा नोंदणी कायदा १८६० अन्वये दिनांक १-३-१९२१ इ. रोजी. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | | मुंबई सार्वजनिक न्यास कायदा १९५० अन्वये दिनांक ३-१०-१९५२ रोजी नोंदणी क्रमांक फ-४ | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | | संस्थेचे नांव : '' सांगली शिक्षण संस्था, सांगली ''(दि सांगली एज्युकेशन सोसायटी, सांगली) हे राहील व तिचे मुख्य कार्यालय सांगली येथे राहील. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| (१) | | | २ | उद्दिष्टे :- | उद्दिष्टे :- | |
| | २) | | २ | औपचारिक व अनौपचारिक शिक्षणासाठी आवश्यक त्या पायाभूत भौतिक सुविधा, नित्योपयोगी व नैमित्तिक वस्तू, साहित्य, पदार्थ, निर्माण करुन अथवा उपलब्ध करुन घेऊन संबंधितांना सशुल्क अथवा निःशुल्क पुरविणे. | औपचारिक व अनौपचारिक शिक्षणासाठी आवश्यक त्या पायाभूत भौतिक सुविधा, नित्योपयोगी व नैमित्तिक वस्तू, साहित्य, पदार्थ इत्यादी खरेदी करुन, निर्माण करुन, अथवा उपलब्ध करुन घेऊन संबंधितांना सशुल्क अथवा निःशुल्क पुरविणे. | सुस्पष्टता यावी म्हणून. |
| | ३) | | २ | औपचारिक व अनौपचारिक शिक्षणासाठी आवश्यक असे सर्व प्रकारचे साहित्य तयार करुन घेणे व ते प्रकाशित करुन संबंधितांना सशुल्क अथवा निःशुल्क पुरविणे. | औपचारिक व अनौपचारिक शिक्षणासाठी आवश्यक असे सर्व प्रकारचे साहित्य तयार करुन घेणे, खरेदी करणे व ते प्रकाशित करुन संबंधितांना सशुल्क अथवा निःशुल्क पुरविणे. | सुस्पष्टता यावी म्हणून. |
| (२) | | | ३ | स्पष्टीकरणे (Interpretations) | स्पष्टीकरणे (Interpretations) | |
| | ४) | | ३ | संचालक मंडळ म्हणजे संस्थेचे आश्रयदाते सदस्य, विशेष सदस्य, सामान्य सदस्य, यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी, शिक्षक सेवकांनी आपणातून निवडून दिलेले प्रतिनिधी, नियुक्त मुख्याध्यापक, शिक्षक आणि शासकीय व विद्यापीठ नियमानुसार पदसिध्द सदस्य अशा सर्व सदस्यांचे मंडळ. | संचालक मंडळ म्हणजे संस्थेचे आश्रयदाते सदस्य, विशेष सदस्य, सामान्य सदस्य, यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी, नियुक्त मुख्याध्यापक, शिक्षक आणि शासकीय व विद्यापीठ नियमानुसार पदसिध्द सदस्य, कार्यवाह अशा सर्व सदस्यांचे मंडळ. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | ५) | | ३ | वर्ष म्हणजे महाराष्ट्र शासनाने स्वीकृत केलेले आर्थिक वर्ष. | वर्ष म्हणजे शासनाने स्वीकृत केलेले आर्थिक वर्ष. | सुस्पष्टता यावी म्हणून. |
| | ८) | | ३ | शिक्षक या संज्ञेत संस्थेने आपल्या पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आदि शाळांतून शिक्षक म्हणून नेमलेली व्यक्ती आणि महाविद्यालयातील व्याख्याते व शासनाने वा विद्यापीठाने शिक्षक म्हणून मान्यता दिलेल्या व्यक्ती यांचा समावेश होतो. | शिक्षक या संज्ञेत :<br>अ) संस्थेने आपल्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आदि शाळांतून शिक्षक म्हणून नेमलेली व्यक्ती.<br>ब) महाविद्यालया मधील व्याख्याते, व विद्यापीठाने शिक्षक म्हणून मान्यता दिलेली व्यक्ती.<br>क) संस्थेच्या औपचारिक, अनौपचारिक शिक्षण देणा-या उपक्रमातील संस्थेने शिक्षक म्हणून मान्यता दिलेली व्यक्ती. यांचा समावेश होतो. | सुस्पष्टता यावी म्हणून |
| ९) | | | ३ | सेवक या संज्ञेत संस्थेने आपल्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आदि शाळांत व महाविद्यालये यात नेमलेल्या अंशवेळ, अर्धवेळ, पूर्णवेळ काम करणारे शिक्षकेतर सेवक यांचा समावेश होतो. | सेवक या संज्ञेत संस्थेने आपल्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आदि शाळांत, महाविद्यालये, संस्थेचे कार्यालय तसेच औपचारिक,अनौपचारिक शिक्षण देणा-या उपक्रमातील संस्थेने नेमलेल्या अंशवेळ, अर्धवेळ, पूर्णवेळ काम करणारे शिक्षकेतर सेवक यांचा समावेश होतो. | सुस्पष्टता यावी म्हणून. |
| (३) | अ) | | ३ | सदस्यत्वाबाबतचे नियम | सदस्यत्वाबाबतचे नियम | |
| | ९) | | ४ | कायद्याने सज्ञान असलेली व्यक्ती सदस्य होण्यास व मतदानास पात्र राहील. पेढया, हिंदू एकत्र कुटुंबे, संस्था व संघटित घटक यांचे संस्थेने मान्यता दिलेले प्रतिनिधी मतदानास पात्र राहतील. मात्र अशा प्रतिनिधीस संचालक मंडळाच्या निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे रहाता येणार नाही. | कायद्याने सज्ञान असलेली व्यक्ती सदस्य होण्यास व मतदानास पात्र राहील. पेढया, हिंदू एकत्र कुटुंबे, संस्था व संघटित घटक यांचे संस्थेने मान्यता दिलेले प्रतिनिधी मतदानास पात्र राहतील. मात्र अशा प्रतिनिधीस संचालक मंडळाच्या निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे रहाता येणार नाही. यापुढे संस्थेचे सभासद होणा-या पेढया, हिंदू एकत्र कुटुंबे, संस्था व संघटित घटक यांना व त्यांचे प्रतिनिधीस मतदानाचा अधिकार रहाणार नाही. | सुस्पष्टता यावी म्हणून. |
| (३) | ब) | | ५ | सदस्यांचे अधिकार व कर्तव्य | सदस्यांचे अधिकार व कर्तव्य | |
| | | ५) | ५ | सदस्य झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे पूर्ण झाल्या शिवाय त्यांना संचालक मंडळाच्या 'अ' वर्गीय सदस्यांच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही. संस्थेचे सदस्य म्हणून यापूर्वी (म्हणजेच दि. १७.९.२०११ पूर्वी) ज्यांना संचालक मंडळाने मान्यता दिली आहे अशा सदस्यांना हा नियम लागू होणार नाही. संस्थेच्या सेवेत असणा-या सदस्यांना अ वर्गीय संचालक मंडळाच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही. | सदस्य झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षे पूर्ण झाल्याशिवाय त्यांना संचालक मंडळाच्या 'अ' वर्गीय सदस्यांच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही. संस्थेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या सदस्यांना ते निवृत्त झाल्याच्या तारखेनंतर सहा वर्षे ' अ ' वर्गीय सदस्यांच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही. संस्थेच्या सेवेत असणा-या सदस्यांना अ वर्गीय संचालक मंडळाच्या निवडणूकीस उभे रहाता येणार नाही. | वैयक्तिक व आर्थिक हितसंबंध येऊ नयेत व लाभाच्या पदाचा दुरुपयोग होऊ नये म्हणून |
| (४) | | | ५ | अखिल सदस्य मंडळ | अखिल सदस्य मंडळ | |
| | १) | | ५ | संस्थेचे आश्रयदाते सदस्य, विशेष सदस्य, सामान्य सदस्य, संचालक मंडळावरील नियुक्त ब,क,ड आणि इ या वर्गातील सदस्य या सर्वांचे मिळून अखिल सदस्य मंडळ (General Body) होईल. | संस्थेचे आश्रयदाते सदस्य, विशेष सदस्य, सामान्य सदस्य, संचालक मंडळावरील नियुक्त ब,क,ड या वर्गातील सदस्य या सर्वांचे मिळून अखिल सदस्य मंडळ (General Body) होईल. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे |
| | २) | | ५ | संचालक मंडळावरील ब, क, ड, आणि इ वर्गातील सदस्य हे त्यांच्या संचालक मंडळावरील प्रतिनिधित्वाच्या कालावधीपुरते अखिल सदस्य मंडळाचे सदस्य राहतील. | संचालक मंडळावरील ब, क, ड, वर्गातील जे सदस्य संस्थेचे सभासद नाहीत ते त्यांच्या संचालक मंडळावरील प्रतिनिधित्वाच्या कालावधीपुरते अखिल सदस्य मंडळाचे सदस्य राहतील. | सुस्पष्टता यावी म्हणून. |
| (५) | | | ५ | संस्थेची अधिकार मंडळे | संस्थेची अधिकार मंडळे | |
| | | | ५ | संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली खालील मंडळे राहतील. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | १) | | ५ | नियोजन मंडळ | वगळणे | संस्थेच्या अंतर्गत कामाच्या सोयीसाठी. |
| (७) | अ) | | ६ | अखिल सदस्य मंडळाच्या सभा | अखिल सदस्य मंडळाच्या सभा | |
| | १०) | | | अखिल सदस्य मंडळाच्या वार्षिक सर्व साधारण सभेत सामान्यतः पुढील कामकाज होईल. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | ७ | १) संस्थेच्या वार्षिक अहवालास व जमाखर्चास मान्यता देणे. | १) संस्थेच्या वार्षिक अहवालास व जमाखर्चास, खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे. तसेच संस्था, तिच्या घटक संस्था/शाळा/विभाग यांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे. | सभासदांच्या मार्फत लेखा परीक्षकाची नियुक्ती व्हावी म्हणून. |
| (७) | | | ७ | संचालक मंडळ | संचालक मंडळ | |
| | | | | अखिल सदस्य मंडळाच्या वतीने संचालक मंडळ संस्थेचा सर्व कारभार पाहील.<br>सदर संचालक मंडळाची रचना खालील प्रमाणे असेल. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| (७) | अ) | | ७ | '' अ '' वर्गीय सदस्य | अ) १) बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | | संस्थेच्या आश्रयदाते, विशेष आणि सामान्य सदस्यांमधून निवडून आलेले ९ (नऊ) सदस्य. या ९ सदस्यांपैकी ६ (सहा) सांगली महानगरपालिका क्षेत्रातील व ३ (तीन) बाहेरील असतील. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| (७) | ब) | | ७ | सम्मिलीत सदस्य | अ) २) बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | | संचालक मंडळ पूर्णपणे अस्तित्वात आलेवर फक्त ''अ'' वर्गीय सदस्य शिक्षकेतर सेवकेतर सदस्यांमधून जरुर तर २ (दोन) सदस्य सम्मिलीत करु शकतील. या सदस्यांना संचालक मंडळावरील ''अ'' वर्गीय सदस्यांचे सर्व अधिकार असतील. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| (७) | क) | | ८ | ''ब'' वर्गीय सदस्य | वगळणे. | |
| | | | ८ | शिक्षक व सेवक यांनी आपणांतून निवडून दिलेले ३ (तीन) मुख्याध्यापकेतर कायम शिक्षक, यापैकी एक प्राथमिक व दोन माध्यमिक शिक्षक असतील. सदरची निवडणूक संचालक मंडळाच्या आदेशाने संस्थेमार्फत ''अ'' वर्गीय सदस्यांच्या निवडणूकीपूर्वी शाळा सुरु असताना घेतली जाईल. | वगळणे. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | | | ८ | खालील परिस्थितीत शिक्षकांना संचालक मंडळाच्या निवडणुकीस उभे राहता येणार नाही. | वगळणे. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | | | ८ | १) जर शिक्षकाच्या सेवेबाबत प्रकरण कोणत्याही न्यायालयात अथवा न्यायाधिकरणापुढे न्यायप्रविष्ट असेल तर | वगळणे. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | | | ८ | २) जर शिक्षकाची सेवा संस्थेत किमान दहा वर्षे झाली नसेल तर | वगळणे. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | | | ८ | ३) जर शिक्षकाची सेवा किमान सहा वर्षे शिल्लक राहिली नसेल तर | वगळणे. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| (७) | ड) | | ८ | क वर्ग सदस्य | ब) ब वर्ग सदस्य | |
| | | | ८ | अ वर्गीय सदस्यांनी संचालक मंडळावर नियुक्त केलेले तीन शिक्षक व मुख्याध्यापक सदस्य. सामान्यपणे यात माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक समन्वय समित्यांचे कार्यवाह असतील. | अ वर्गीय सदस्यांनी संचालक मंडळावर नियुक्त केलेले सहा शिक्षक व मुख्याध्यापक सदस्य. सामान्यपणे यातील दोन मुख्याध्यापक आणि एक शिक्षक हे माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा समन्वय समित्यांचे कार्यवाह असतील. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| (७) | इ) | | ८ | ड वर्ग सदस्य | क) क वर्ग सदस्य | |
| | | | ८ | शासन व विद्यापीठ नियमानुसार आवश्यक असतील ते पदसिध्द सदस्य राहतील. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| (७) | फ) | | ८ | इ वर्ग सदस्य कार्यवाह | ड) ड वर्ग सदस्य | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | | | ८ | वरील अ, ब, क, ड वर्गाबाहेरील कार्यवाह म्हणून नियुक्ती झाली असेल तर असे जास्तीत जास्त दोन कार्यवाह संस्थेच्या संचालक मंडळाचे सदस्य असतील. | वरील अ, ब, क, वर्गाबाहेरील कार्यवाह म्हणून नियुक्ती झाली असेल तर असे जास्तीत जास्त दोन कार्यवाह संस्थेच्या संचालक मंडळाचे सदस्य असतील. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | | | ८ | टीप :- वर नमूद क, ड व इ वर्गाच्या संचालकांना संचालक मंडळाच्या सभेत मतदान करण्याचा अधिकार असणार नाही. | टीप :- वर नमूद ब,क, ड वर्गाच्या संचालकांना संचालक मंडळाच्या सभेत मतदान करण्याचा अधिकार असणार नाही. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | १) | | ८ | कोणत्याही वर्गातील ठरविलेल्या जागांसाठी संचालक मंडळाच्या निडणुकीसाठी पुरेसे अर्ज न आल्यास ज्या वर्गातील जागा रिकाम्या राहतील त्या वर्गातील सदस्यांतून आवश्यक त्या जागा नवे संचालक मंडळ नियुक्त करुन भरेल. | अ वर्गातील ठरविलेल्या जागांसाठी संचालक मंडळाच्या निडणुकीसाठी पुरेसे अर्ज न आल्यास त्या वर्गातील सदस्यांतून आवश्यक त्या जागा नवे संचालक मंडळ नियुक्त करुन भरेल. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | २) | | ८ | संचालक मंडळाची निवड दर ५ (पाच) वर्षांनी होईल. संचालक सदस्य निवडणुकीस पुन्हा उभे राहण्यास पात्र असतील. संचालक मंडळाच्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये अ, क व इ वर्गातील जागा कोणत्याही कारणाने रिक्त झालेस सदर जागा भरुन काढण्यासाठी कार्यवाह संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्यांची सभा बोलवितील व त्या सभेचा सदर मोकळया जागा भरण्यासंबंधीचा निर्णय संचालक मंडळाकडे पाठविण्यात येईल व त्यानुसार संचालक मंडळाच्या ठरावाने तशा रिक्त जागा भरण्यात येतील. | संचालक मंडळाची निवड दर ५(पाच) वर्षांनी होईल. अ वर्ग संचालक सदस्य निवडणुकीस पुन्हा उभे राहण्यास पात्र असतील.संचालक मंडळाच्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये अ, ब, क, ड वर्गातील जागा कोणत्याही कारणाने रिक्त झालेस सदर जागा भरुन काढण्याचा अधिकार अ वर्गीय संचालकांना असेल. त्यासाठी कार्यवाह संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्यांची सभा बोलवितील व त्या सभेचा सदर मोकळया जागा भरण्यासंबंधीचा निर्णय संचालक मंडळाकडे पाठविण्यात येईल व त्यानुसार संचालक मंडळाच्या ठरावाने तशा रिक्त जागा भरण्यात येतील. | इ वर्ग ड वर्गात गेल्याने. |
| | ३) | | ८ | संचालक मंडळाच्या पाच वर्षाच्या कालावधी मध्ये ब वर्गातील जागा कोणत्याही कारणाने रिक्त झालेस सदर जागा भरणेसाठी संचालक मंडळावरील उर्वरित ब वर्गीय संचालकांशी विचार विनिमय करुन, अ वर्गीय संचालकांची सभा घेऊन सदर मोकळया जागा भरण्यासंबंधीचा निर्णय संचालक मंडळाकडे पाठविण्यात येईल व त्यानुसार संचालक मंडळाच्या ठरावाने तशा रिक्त जागा भरण्यात येतील. | वगळणे. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |

(मागे पहा)

| अ.क्र. | | | विद्यमान घटना पृष्ठ क्रमांक | सध्याच्या घटनेतील मूळ कलम | सुचविलेली दुरुस्ती/वाढ/बदल | कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | ६) | | ९ | संचालक मंडळाच्या अ वर्गीय सदस्यांच्या निवडणुकीनंतर संस्थेचे कार्यवाह नवीन निवडून आलेल्या अ वर्गीय सदस्यांची सभा तीन दिवसांची मुदत ठेवून बोलावतील. त्यामध्ये खालील कामकाज होईल. | बदल/दुरुस्ती/वाढ नाही | |
| | | | ९ | ३) संचालक मंडळाच्या अ ब क ड वर्गीय सदस्यांमधील अथवा बाहेरील कमीत कमी एक व जास्तीत जास्त दोन व्यक्तींची संचालक मंडळाचे कार्यवाह म्हणून निवड करणे. | ३) संचालक मंडळाच्या अ, ब, क, वर्गीय सदस्यांमधील अथवा बाहेरील कमीत कमी एक व जास्तीत जास्त दोन व्यक्तींची संचालक मंडळाचे कार्यवाह म्हणून निवड करणे. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| (९) | | | १० | संचालक मंडळाची कामे | संचालक मंडळाची कामे | |
| | ५) | | १० | नियोजन मंडळ, समन्वय समिती, शालेय समिती व महाविद्यालयीन समिती यांच्या कामावर देखरेख ठेवणे व त्यांच्याकडून येणाऱ्या शिफारशींचा विचार करुन निर्णय घेणे. | समन्वय समिती, शालेय समिती व महाविद्यालयीन समिती यांच्या कामावर देखरेख ठेवणे व त्यांच्याकडून येणा–या शिफारशींचा विचार करुन निर्णय घेणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | ६) | | १० | संस्थेच्या संचालक मंडळावरील ''अ'' वर्गीय सदस्यांच्या व ''ब'' वर्गीय सदस्यांच्या निवडणुकी बाबतची कामे जरुर ते नियम अखिल सदस्य मंडळाच्या मंजुरीने तयार करुन निवडणुका पार पाडणे. | संस्थेच्या संचालक मंडळावरील ''अ'' वर्गीय सदस्यांच्या निवडणुकीबाबतची कामे जरुर ते नियम अखिल सदस्य मंडळाच्या मंजुरीने तयार करुन निवडणुका पार पाडणे. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| | १२) | | १० | संस्थेचे कायदेविषयक सल्लागार, लेखा परीक्षक व आवश्यकतेनुसार अन्य सल्लागार यांची नियुक्ती करणे. | संस्थेचे कायदेविषयक सल्लागार व आवश्यकतेनुसार अन्य सल्लागार यांची नियुक्ती करणे. | लेखापरीक्षक नियुक्ती अखिल सदस्य मंडळाकडे गेल्यामुळे. |
| (१०) | (अ) | | ११ | नियोजन मंडळ | वगळणे. | |
| | | | ११ | संस्थेचे शैक्षणिक, प्रशासकीय, आर्थिक धोरण व कार्यवाहीबाबत संचालक मंडळास शिफारस करणारा प्रारुप आराखडा तयार करुन देणेसाठी एक नियोजन मंडळ असेल. नियोजन मंडळाने तयार केलेला प्रारुप आराखडा जसाच्या तसा, अथवा त्यात फेरबदल करुन स्वीकारणे, किंवा संपूर्णपणे फेटाळणे व नव्याने स्वतः आराखडा तयार करणे हे अधिकार संचालक मंडळास राहतील. नियोजन मंडळाची स्थापना संचालक मंडळ करेल. नियोजन मंडळाची रचना खालील प्रमाणे असेल. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | १) | ११ | संस्थेचे उपाध्यक्ष हे नियोजन मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष असतील. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | २) | ११ | संस्थेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा समन्वय समितीचे अध्यक्ष सदस्य. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ३) | ११ | संस्थेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा समन्वय समितीचे कार्यवाह सदस्य. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ४) | ११ | संचालक मंडळावरील सर्व ब वर्गीय शिक्षक प्रतिनिधी. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ५) | ११ | संस्थेच्या माध्यमिक शाळांतील दोन आणि प्राथमिक शाळेतील एक मुख्याध्यापक सदस्य. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ६) | ११ | संस्थेच्या पूर्व प्राथमिक शाळांचे तीन सुपरिटेंडेंट सदस्य. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ७) | ११ | संस्थेच्या माध्यमिक शाळांतील दोन आणि प्राथमिक शाळेतील एक शिक्षक सदस्य. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ८) | ११ | संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील एक शिक्षक आणि महाविद्यालयातील एक शिक्षक सदस्य. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ९) | ११ | संस्थेच्या शिक्षकेतर सेवकांमधील एक सदस्य. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | १०) | ११ | आवश्यकता भासलेस संस्थेच्या सदस्यांमधील अथवा संस्थाबाहय तीन तज्ज्ञ व्यक्ती सदस्य. या समितीच्या सदस्यांमधूनच एका सदस्याची कार्यवाह म्हणून नियोजन मंडळाच्या पहिल्या सभेत निवड होईल. नियोजन मंडळाचा कालावधी हा संचालक मंडळाच्या मुदतीपर्यंत राहील. मंडळाच्या स्थापनेनंतर सदस्यांत फेर बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळाकडे राहील. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| (१०) | (ब) | | ११ | नियोजन मंडळाची कामे | वगळणे. | |
| | | १) | ११ | संस्थेची आर्थिक बाजू सुस्थिर व मजबूत रहावी यासाठी योजना संचालक मंडळास तयार करुन देणे. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | २) | ११ | शाखांच्या अर्थव्यवस्थेबाबतआणि शाखांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठीचा आराखडा संचालक मंडळास तयार करुन देणे. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ३) | १२ | शाखांच्या सुस्थिरतेच्या दृष्टीने संचालक मंडळास आराखडा तयार करुन देणे. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ४) | १२ | संस्थेच्या विविध शाखांमधील कामामध्ये सुधारणा व सुकरता आणि जलद कार्यवाही याबाबत मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर सेवक यांना मार्गदर्शनपर नियोजनाचा आराखडा तयार करुन देणे. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ५) | १२ | शासनाकडून येणा–या परिपत्रकांचा अभ्यास करुन संचालक मंडळास संस्थेच्या धोरणा विषयी आपले मत कळविणे. | वगळणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| (११) | | | १२ | कार्यवाहांची कामे | कार्यवाहांची कामे | |
| | | ६) | १२ | कामकाजातील सुधारणा, सुकर आणि जलद कार्यवाही याबाबत व्यवस्थापन मंडळाकडून आलेल्या सूचनांची अंमलबजावणी होत आहे हे पाहणे. | वगळणे. | व्यवस्थापन मंडळ वगळल्यामुळे. |
| | | ७) | १२ | विविध समित्यांकडून वा मंडळांकडून जी कामे संचालक मंडळाकडे मंजुरीसाठी येतील त्यांची पाहणी व छाननी करुन आपल्या मतप्रदर्शनासह ती कामे संचालक मंडळापुढे ठेवणे. | विविध समित्यांकडून जी कामे संचालक मंडळाकडे मंजुरीसाठी येतील त्यांची पाहणी व छाननी करुन आपल्या मतप्रदर्शनासह ती कामे संचालक मंडळापुढे ठेवणे. | नियोजन मंडळ वगळल्यामुळे. |
| (१३) | | | १३ | अर्थव्यवस्था | अर्थव्यवस्था | |
| | | ४) | १३ | बँकेचे व्यवहार कार्यवाह, अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचे स्वाक्षरीने होतील. मात्र यापैकी दोघांची स्वाक्षरी बंधनकारक राहील. | अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचेपैकी कोणीही एक व कार्यवाहांपैकी कोणीही एक अशा संयुक्त स्वाक्षरीने बँकचे व्यवहार होतील. | सुस्पष्टता यावी म्हणून. |
| (१४) | | | १३ | संचालक मंडळावरील ''अ'' वर्गीय सदस्य व शिक्षक प्रतिनिधी यांची निवडणूक. | संचालक मंडळावरील ''अ'' वर्गीय सदस्यांची निवडणूक. | |
| | | | १३ | संचालक मंडळ दर पाच वर्षानी १ ऑक्टोबर ला अस्तित्वात येईल. संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्य आणि शिक्षक प्रतिनिधी यांच्या निवडणूका दर पाच वर्षानी संस्थेच्या अखिल सदस्य मंडळाने मंजूर केलेल्या निवडणूक नियमानुसार होतील. | संचालक मंडळ दर पाच वर्षानी १ ऑक्टोबर ला अस्तित्वात येईल. संचालक मंडळावरील अ वर्गीय सदस्यांची निवडणूक दर पाच वर्षानी संस्थेच्या अखिल सदस्य मंडळाने मंजूर केलेल्या निवडणूक नियमानुसार होईल. | (७) क) मधील शिक्षक प्रतिनिधी पदांचा समावेश ब वर्ग सदस्यात केल्यामुळे. |
| (१६) | | | १४ | घटनेची अंमलबजावणी | घटनेची अंमलबजावणी | |
| | | | | ही घटना अंमलात येईल त्या दिवसापासून पूर्वीची घटना (२८.१२.१९९७ रोजी अस्तित्वात आलेली) व पोटनियम (बायलॉज) रद्दबातल मानण्यात येतील. (मात्र या घटनेतील तरतुदीनुसार निर्माण व्हावयाच्या भिन्न भिन्न बाबी, नियम व पोटनियम या घटनेप्रमाणे प्रत्यक्ष अस्तित्वात येईपर्यंत पूर्वीच्या घटनेप्रमाणेच पण या घटनेशी विसंगत होणार नाही अशा पध्दतीने चालू राहतील.) | वरील दुरुस्त्यांना अखिल सदस्य मंडळाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या तारखेपासून सर्व घटना अंमलात येईल व त्या दिवसापासून पूर्वीची घटना (१२.११.२०११ रोजी अस्तित्वात आलेली) व पोटनियम (बायलॉज) रद्दबातल मानण्यात येतील. (मात्र या घटनेतील तरतुदीनुसार निर्माण व्हावयाच्या भिन्न भिन्न बाबी, नियम व पोटनियम या घटनेप्रमाणे प्रत्यक्ष अस्तित्वात येईपर्यंत पूर्वीच्या घटनेप्रमाणेच पण या घटनेशी विसंगत होणार नाही अशा पध्दतीने चालू राहतील.) | |

* * * * *